राजकीय पक्षांनी निवडणूक खर्चाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र : रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/सं.कक्ष
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५/१०/२०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

विषय :- राजकीय पक्षांनी निवडणूक खर्चाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत...

महोदय/महोदया,

दि.२४/१०/२०१६ रोजी राजकीय पक्षांच्या बैठकीमध्ये सर्व पक्षांनी असे सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ-२०१६/उनिख/प्र.क्र.१३/का. संगणकीकरण कक्ष, दि.१५/१०/२०१६ मधील परि.१०.१ (i) (ब) नुसार "निवडणूक लढविणाऱ्या सर्व राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थेकरिता प्रत्येक जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र बँक खाते उघडण्याची" तरतूद करण्यात आली आहे. मात्र, येणाऱ्या नगरपालिकेच्या/ नगरपंचायतीच्या निवडणुकांकरिता सदरची तरतुदी ऐवजी, राज्यासाठी एक स्वतंत्र बँक खात्याची तरतूद करावी, अशी विनंती केली. त्यांनी असेही सांगितले की, जिल्हास्तरीय बँक खाते उघडणे व त्याचे सर्व व्यवहार मुख्यालयातून हाताळणे कठीण होईल.

सदर राजकीय पक्षानी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने आयोगाने त्यांची विनंती मान्य केली आहे. सदर मान्यतेनुसार येणाऱ्या नगरपालिका/ नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता सर्व राजकीय पक्षांनी राज्यस्तरीय एक स्वतंत्र बँक खाते उघडावे व नगरपालिका/ नगरपंचायतींच्या निवडणुकांचा सर्व खर्च त्या खात्यातूनच करावा. असे खाते उघडल्यानंतर राज्य निवडणूक आयोग यांना त्या खात्याचा तपशिल (खाते क्रमांक, बँकेचे नाव, शाखेचे नाव) कळवावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपला,

(अविनाश सणस)
प्रभारी उपायुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- सर्व राजकीय पक्ष

Sanas sir/Letter to parties